# आदेश निशाणी ६३ खाली

(पारित दिनांक.२४/०९/२०२१)

१. अर्ज व सदर अर्जावर प्रतिवादी यांनी दिलेले म्हणणे (नि.कं ६५) चे अवलोकन केले. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ (या पुढे “संहिता”) चे आदेश ६ नियम १७ प्रमाणे मुळ दाव्यात दुरुस्ती करण्याकरिता दिलेला आहे.

२. वादींचे असे कथन आहे की, हा दावा प्रलंबित असताना प्रतिवादींनी कुलमुखत्यार पत्राच्या आधारे स्वत:चे नावे वाद जमीन पैकी गट नं ३८२/अ व ३८२/ब याचे खरेदीखत दि.२७/१०/२०१६ रोजी करुन घेतलेले आहे. सदरचे खरेदीखत हे बोगस व बनावट असुन ते वादी यांचे हिश्यावर बंधनकाराक नाही. सदर खरेदीखताच्या अनुषंगाने मुळ दाव्यात दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

३. प्रतिवादींनी म्हणण्ण्या मध्ये झालेले खरेदीखत हे कायदेशीर आहे. वादी यांनी मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती झाल्यास दाव्याचे स्वरुपात बदल होत आहे. अशा स्वरुपाची हरकत घेउन अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली आहे.

४. वादी तर्फे विधिज्ञ श्री.चवळे व प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री.शेटे यांचा दि. ०६/०९/२०२१ रोजी युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी यांनी दिलेला लेखी युक्तीवाद नि.क्र ७७ चे अवलोकन केले.

५. अर्जाचे स्वरुप पाहता सर्व प्रथम प्रस्तावित दुरुस्ती दाव्याचे अंतिम न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक आहे काय? हे पाहणे उचित आहे. सर्वप्रथम प्रतिवादी यांनी लेखी कैफियत अभिलेखावर दिली नसली तरी त्यांचे म्हणण्यामध्ये प्रस्तावित अर्जात कथन केल्याप्रमाणे खरेदीखत झाल्याचे मान्य केले आहे. वादी तर्फे विधिज्ञ यांनी दावा दाखल झाल्यानंतर खरेदीखत झाले असल्याने दुरुस्ती आवश्यक आहे असे सांगितले आहे. खरेदी

देणार या वयस्कर व्यक्ती आहेत. या विरुध्द प्रतिवादी तर्फे विधिज्ञ यांनी प्रस्तावित दुरुस्ती हि वादी यांना सन २०१६ पासुन ज्ञात होती. परंतु, प्रस्तुतचा अर्ज हा विलांबाने डिसेंबर २०१९ मध्ये दिलेला आहे. सदर दुरुस्तीस मुदतीच्या कायदयाची बाधा येत आहे.

६. मुळ दावा हा ठराव व निरंतर ताकिदीकरिता दाखल आहे. वादातीत कुलमुखत्यारपत्र व दाव्यामधील नमुद खरेदीखत हे वादी यांचे हक्कावर बंधनकारक नाहीत, अशी स्पष्ट मागणी वादी यांची आहे. अर्जामधील नमुद खरेदीखत हे दावा दाखल झाल्यानंतर नोंदणीकृत झाले आहे, हे प्रतिवादी यांनी दिलेल्या म्हणण्यावरुन स्पष्ट होत आहे. मुळ दाव्याचे स्वरुप पाहता अर्जामधील नमुद खरेदीखताच्या अनुषंगाने मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती होणे आवश्यक आहे. प्रस्तावित दुरुस्तीचे अवलोकन केले असता, सदर दुरुस्ती ही वर नमुद खरेदीखताचे अनुषंगाने व दाव्याची मुल्यांकनाच्या अनुषंगाने आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही अंतिम न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक असल्याने सदर दुरुस्ती मुदतीमध्ये आहे काय? याबाबत सखोल जाणे उचित होणार नाही. उपरोक्त विवेचनावरुन प्रस्तावित दुरुस्ती आवश्यक असल्याने अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करिता खालील आदेश.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज नि.क्र ६३ मंजुर करण्यात येतो. |
| २. | वादी यांनी अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती विहीत कालावधी मध्ये करुन दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी. |
| ३. | खर्चाबाबत आदेश नाही. |

(स.का.मुळे)

दि.२४/०९/२०२१ दिवाणी न्यायाधीश क.स्तर,भोर, जि.पुणे.